# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.10.2024** **वार – सोमवार**

---

**परिवर्तन महाशक्ती**

राज्यात नव्याने स्थापन झालेल्या परिवर्तन महाशक्ती आघाडीनं 10 उमेदवारांची आपली पहिली यादी जाहीर केली. यापैकी 8 जागा प्रहार जनशक्ती पक्षाला, तर, दोन जागा राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेला देण्यात आल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजूशेट्टी यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. यावेळी महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे, प्रहार जनशक्तीपक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी उपस्थित होते. परिवर्तन महाशक्ती आघाडीने अचलपूरमधून बच्चूकडू यांना उमेदवारी दिली आहे. रावेरमधून अनिल चौधरी, चांदवड विधानसभा मतदारसंघातून गणेश निंबाळकर, देगलूर बिलोलीमधून सुभाष साबणे, ऐरोली मधून अंकुश कदम, हदगाव हिमायतनगरमधून माधव देवसरकर, हिंगोलीमधून गोविंदराव भवर, तर राजुरामधून वामनराव चटप यांनी उमेदवारी देण्यात आली आहे.

**भाजपा-पुणे**

भारतीय जनता पक्षानं पुण्यातील काही विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांची यादी काल जाहीर केली; त्यानंतर आज पुण्यात, महायुतीच्या सहयोगी पक्षांची बैठक पार पडली. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, भाजपचे कोथरूड विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार चंद्रकांत पाटील यांच्यासह राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दिपक मानकर आदी यावेळी उपस्थित होते.

**पुणे कॅन्टोमेंट निवडणूक**

आगामी विधानसभा निवडणूक सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने, पुणे कॅन्टोमेंट विधानसभा मतदारसंघात निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. या मतदार संघात 73 इमारतींमध्ये 274 मतदान केंद्र असून 2 लाख 93 हजार 453 मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सिद्धार्थ भंडारे यांनी दिली आहे. आदर्श आचारसंहितेअंतर्गत या मतदार संघातील विविध राजकीय पक्षांनी विनापरवाना लावलेली 295 पोस्टर्स, फलक आणि झेंडे यावर कारवाई करण्यात आली आहे.

**बनावट प्रमाणपत्रे**

बनावट जात प्रमाणपत्र घेऊन अनुसूचित जातीसाठी राखीव असणाऱ्या मतदारसंघात निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करणार असल्याचं सत्यशोधक बहुजन आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सचिन बगाडे यांनी स्पष्ट केलं. आज पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. याबाबत सर्व प्रमुख पक्षाच्या नेत्यांशी पत्रव्यवहार चालू असून अशा उमेदवारांविरुद्ध सत्यशोधक बहुजन आघाडी सर्व दलित संघटनांना बरोबर घेऊन राज्यभर लढा उभारणार असल्याचे बगाडे यांनी यावेळी सांगितलं.

**झिका गर्भवती**

जुलै आणि सप्टेंबर या कालावधीत पुणे शहरात झिकाचे शंभर रूग्ण आढळले, त्यापैकी 43 गर्भवती महिला होत्या. यापैकी दहा महिलांची आतापर्यंत प्रसूती झाली असून सर्व बाळं निरोगी असून कोणालाही झिकाची लागण झाली नसल्याचं स्पष्ट झालं आहे. अशी माहिती महापालिका आरोग्य अधिकारी सहायक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांनी दिली.

**वीज बिल भरणा**

वीजबिलांचा ऑनलाइन भरणा करण्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील वीजग्राहकांचा प्रतिसाद वाढत आहे. पुणे जिल्ह्यातील 25 लाख 84 हजार 430 वीजग्राहकांनी 796 कोटी रुपयांचा वीजबिल भरणा ऑनलाइन केला आहे.

**गुणीजान बंदिश स्पर्धा**

प्रसिद्ध हिंदुस्थानी शास्त्रीय गायक पद्मभूषण पंडित सी. आर. व्यास यांच्या 100व्या जयंतीनिमित्त, गुणीजान रिसर्च आर्ट कल्चर अँड एज्युकेशन फाऊंडेशनतर्फे देशपातळीवरील गुणीजान बंदिश स्पर्धा पुण्यात घेण्यात आली. यात, महिला गटात वाराणसीच्या तेजस्वीनी वेर्णेकर यांनी प्रथम, सोमदत्ता चॅटर्जी यांनी द्वितीय आणि युगंधरा केचे यांनी तृतीय क्रमांक पटकावला, तर पुरुष गटात मेहेर परळीकर यांनी प्रथम, दर्शन मेलवंकी द्वितीय आणि अथर्व वैरागकर यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्या स्पर्धकांना ज्येष्ठ गायिका आणि अभिनेत्री निर्मला गोगटे, पद्मश्री तालयोगी पंडित सुरेश तळवलकर, पद्मश्री पंडित उल्हास कशाळकर, पंडित सुहास व्यास यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

**मंडई मेट्रो-आग**

पुण्यातील मंडई मेट्रो स्थानकाच्या तळमजल्यावर असलेल्या फोमच्या साहित्याला काल मध्यरात्री आग लागून मोठ्या प्रमाणात धुर निर्माण झाला होता. अग्निशमन दलाने तत्काळ आगीवर नियंत्रण मिळवलं. यात कोणालाही इजा झाली माही; वेल्डिंगचं काम सुरू असताना आग लागली असावी असा प्राथमिक अंदाज आहे.

**क्रिकेट**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने, 12 वर्षांखालील मुलांच्या एसए-आरके अजिंक्यपद करंडक आंतरक्लब क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. या स्पर्धेत विराज तुपे याने केलेल्या 69 धावांच्या जोरावर एसएआरके क्रिकेट ॲकॅडमीने गडहिंग्लजच्या सुनिल चौगुले क्रिकेट ॲकॅडमीचा पराभव केला. अन्य एका सामन्यात लिजंड्स क्रिकेट ॲकॅडमीने सुनिल चौगुले क्रिकेट ॲकॅडमीचा पराभव करत विजयी सलामी दिली.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं. कमाल तापमान 31 तर किमान तापमान 20 पूर्णांक 9 अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्या देखील अशाच स्वरूपाचं हवामान असेल असा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**